भारतीय गैर न्यायिक
भारत INDIA
रु. 500 FIVE HUNDRED RUPEES
पाँच सौ रुपये Rs. 500
सत्यमेव जयते
INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◐ 2021 ◐

BK 404664
25 MAR 2022

NOTARIAL Reg.
ENTRY No. 7227
Date 01/4/22

## —: भागीदारी पत्र :—

सदर भागीदारी पत्र, नागपुर येथे दिनांक ०१/०४/२०२२ रोजी खालील भागीदारांमध्ये तयार करण्यांत येत आहे.

१) **श्री. अशोक आनंदराव धापोडकर,**
वय : ५८, धंदा : शेती व व्यापार,
रा. घर नं. ८६६, जागनाथ बुधवारी,
पाचपावली रोड, कुंभारपूरा, नागपूर,.
**आधार नं. ४०४४ ४७९३ ८०४९,**

१) दस्तऐवज प्रकार/अनुच्छेद क्रमांक आममुखत्यार पत्र

२) दस्त नोंदणी करणार आहेत काय ? होय/नाही

३) नोंदणी होणार असल्याय दुय्यम निबंधक कार्यालयाचे नाव दुय्यक निबधक क्र.

४) मिळकतीचे वर्णन ·

५) मोबदला रक्कम

६) मुद्रांक विकत घेणाऱ्याचे नाव, अशोक पाटिल नागपूर

७) दुसऱ्या पक्षकाराचे नाव

८) हस्ते असल्यास त्यांचे नाव व पत्ता प्रतीक गुजरकर

९) मुद्रांक शुल्क रक्कम

१०) मुद्रांक विक्री नोंद वही अनु. क्रमांक 36281 /दिनांक 25 MAR 2022

११) मुद्रांक विकत घेणाऱ्याची सही

नारायण गं. मोहाडीकर | मुद्रांक विक्रेता, ला. क्र. १५/९१, कोड क्र ४६०१०३३ जिल्हाधिकारी परिसर, त. कार्यालय, नागपूर (शहर)

Gujarkar

२)    **श्री. भारत अशोकराव धापोडकर,**

वय : २९ धंदा : शेती व व्यापार,

रा. घर नं. ८६६, जागनाथ बुधवारी,

पाचपावली रोड, कुंभारपूरा, नागपूर,

पिन कोड : ४४००१७.

**आधार नं. ४१४७ ४४८० १५७८,**

ज्याअर्थी वर नमुद भागीदारांनी संपूर्ण विचार करून इच्छेने व आपसात ठरवून व्यवसाय करण्याचे ठरविले व त्याचप्रमाणे **"अशोक वाटीका "** या नावाने संस्था स्थापीत करण्याचे ठरविले. त्याअर्थी वर उल्लेखीत भागीदारांनी, सदर भागीदाराचे शर्ती व अटी लिखित स्वरूपात नमूद करण्याचे ठरविले आहे.

१)    सदर भागीदारी संस्थेचा व्यवसाय **दिनांक ०१/०४/२०२२** या दिवसापासून स्थापीत झाल्याचे घोषीत करण्यांत येत आहे.

२)    सदर भागीदाराचा व्यवसाय हा **"अशोक वाटीका"** या नावाने स्थापीत करण्याचे ठरविले आहे व यातील भागीदारांच्या सहमतीने दुसरे एखादे नाव ठेवण्याची तरतूद आहे.

३)    सदर भागीदाराचा व्यवसाय हा शेतजमीन (कृषक व अकृषक) विकत घेणे, भूखंड विकत घेणे, विकणे, गैरकृषक करणे, मोजणी करणे, विकसीत करणे, ले—आऊट टाकणे व विकसीत करून संभावित खरेदीदारास विकणे, सदनिका बांधणे, नगरी बांधणे, नगर रचना विभागाकडून तसेच ना.सु.प्र यांच्या कडुन योग्य तशी मंजूरी घेणे, नगर रचना विभागाकडून लेआऊट मंजूर करून घेणे, लहान — मोठे भुखंड विकत घेवून विकसीत करून त्याची विक्री करणे, दोन मजली सदनीका आणि एका पाठोपाठ घरे बांधणे, शेतात घरे बांधून विकने, बांधकाम करून देणे इत्यादी प्रकारे राहील आणि भागीदार आपसांत वेळोवेळी भागीदारीच्या फायदयाच्या दृष्टीने आपसी इतर उदयोगधंदे व कामे सुरू करू शकतील.

४)    सदर भगीदारी संस्थेची गुंतवणूक रक्कम **एकूण रूपये ५०,०००/— (अक्षरी रूपये पन्नास हजार फक्त)** जी की भागीदार क्रं. १ यांनी रू. ३७,५०० /— (अक्षरी रूपये सदतीस हजार पाचशे फक्त) तर भागीदार क्रं. २ यांनी रू. १२,५००/— (अक्षरी रूपये बारा हजार पाचशे फक्त) असे मिळून **एकूण रूपये ५०,०००/— (अक्षरी रूपये पन्नास हजार फक्त)** सारख्या प्रमाणात त्यांना येणाऱ्या नफ्याच्या तुलनेत जमा करावयाचे आहे, तसेच पुढे लागणारे भांडवल/अतिरिक्त भांडवल/गुंतवणूक आवश्यकतेनुसार सर्व भागीदारांकडून वाढविण्यांत येईल.

५)    सदर संस्थेच्या व्यवसायाकरीता त्याचे मुख्य कार्यालय हे **" अशोक वाटीका " ऑ. घर नं. ८६६, जागनाथ बुधवारी, पाचपावली रोड, कुंभारपूरा, नागपूर, जि. नागपूर, ४४००१७,** येथे

राहील. तसेच दोन्ही भागीदारांच्या संमतीने वेळोवेळी ठरविल्याप्रमाणे इतर ठिकाणी कार्यालय सुरू करू शकतात.

६) सदर व्यवसायाचे वित्तीय वर्ष हे १ एप्रिल ते ३१ मार्च असे राहील आणि त्याचप्रमाणे नफा व तोटा हा ठरवून आपसांत समान हिस्यात वाटण्यांत येईल.

७) सदर प्रत्येक भागीदार त्यांनी केलेल्या गुंतवणूकीवर/ खर्चावर १२ टक्के प्रतीवर्ष प्रमाणे त्याच्या मुद्दल रक्कमेच्या नविन गुंतवणूक किंवा कर्जाच्या रक्कमेच्या संदर्भात हक्कदार आहेत किंवा आयकर कायदा १९६१ च्या धारा ४०/ब/अ ने निश्चित केलेल्या दर प्रमाणे प्रत्येक भागीदार हक्कदार आहे किंवा त्या कार्यकाळात विधी कायदयाप्रमाणे लागू होतील तसेच जमा पूंजीवर त्याच दरा प्रमाणे व्याज सुध्दा आकारले जाईल आणि वरील प्रमाणे विधी कायदयानुसार व्याज आकारले जाईल. रोजच्या उत्पादनाच्या आधारे व्याज आकारले व दिले जाणार. संपूर्ण व्यय /खर्च/वजा करून जर नफा होत असेल तरच व्याज दिले जाईल.

८) **अ)** भागीदार क्रं. १ व २ हे कामकाजी भागीदार राहणार आहे आणि त्याच्या मोबदल्यात त्यांना धारा ४०/ब/अ आयकर कायदया प्रमाणे वार्षिक पगार दिला जाईल.

**ब)** वरील वार्षिक पगार वित्तीय वर्षाच्या शेवटी आकारण्यांत येईल आणि वरील वार्षिक पगार खालीलप्रमाणे विभागीत केल्या जाणार –

| | | |
|---|---|---|
| १) **श्री. अशोक आनंदरावजी धापोडकर,** | ७५.०० | टक्के |
| २) **श्री. भारत अशोकराव धापोडकर,** | २५.०० | टक्के |
| | **१००** | **टक्के** |

**क)** सदर बुक नफ्याच्या अर्थ हा विस्थारना ३, धारा ४०/ब/आयकर कायदा १९६१ प्रमाणे लावलेला आहे किंवा त्या कार्यकाळात लागणाऱ्या विधी कायदयाप्रमाणे लागू होतील.

९) सदर भागीदाराचे हक्क व जबाबदारी हे परिछेद क्रं. १३ भारतीय भागीदारी कायदया प्रमाणे राहील. तसेच सदर भागीदार नफा व तोटा खालीलप्रमाणे वाटून घेतील.

| | | |
|---|---|---|
| १) **श्री. अशोक आनंदरावजी धापोडकर,** | ७५.०० | टक्के |
| २) **श्री. भारत अशोकराव धापोडकर,** | २५.०० | टक्के |
| | **१००** | **टक्के** |

सदर संस्थेच्या वार्षिक हिशोबातील नफा व तोटा सर्व पगार दिल्यानंतर किंवा सर्व देय वजा करून निश्चित केल्या जाईल.

१०) सदर भागीदारी ही स्वईच्छा भागीदारी राहील कोणत्याही भागीदारीला निवृत्त व्हायचे असल्यास किंवा भागीदारी सोडायची असल्यास भारतीय भागीदारी कायदयाप्रमाणे सुचना देवून सोडावी लागेल.

११) सर्व धनादेश व बिल भागीदार नं. १ च्या सहीनी कार्यानवीत होतील.

१२) सदर भागीदाराच्या व्यवसायातील सर्व करार व विक्रीपत्र यावर भागीदार क्रं. १ यांची सही अनिवार्य राहतील किंवा त्यांनी आम मुखत्यार म्हणून नेमणूक केलेल्या व्यक्तीला सदर सर्व करार व पत्रांवर सही करता येईल.

१३) सदर भागीदारी संस्थेच्या व्यवसायाकरीता कर्जाची रक्कम/उसनी रक्कम फक्त भागीदारी संस्थेच्या नावावर घेवू शकणार व तसेच उसनी रक्कम/कर्जाऊ रक्कम फक्त भागीदारी संस्थेच्या फायदयाकरीता आणन्यांत येईल आणि वरील रक्कमेचा उपभोग आपल्या व्यक्तीगत फायदयाकरीता करू शकणार नाही. व्यक्तीगत खर्चाकरीता कुठल्याही रक्कमेची उचल केल्यास ती भागीदाराच्या गुंतवणूकीतून वजा करण्यांत येईल.

१४) सदर दोन्ही भागीदार एकमेकांसोबत खरे आणि प्रामाणिक राहतील.

१५) सदर भागीदारी संस्थेचे आर्थिक कामकाजाचे वर्ष वित्तीय वर्षानुसार प्रत्येक वर्ष ३१ मार्चला बंद होतील. तसेच भागीदारी संस्थेच्या व्यवसायाच्या दैनंदिन कामकाजाची व आर्थिक व्यवहारीची नोंद कार्यालयातील रजिस्टरमध्ये नियमीतपणे केली जाईल. तसेच प्रत्येक भागीदार हिशोब पुस्तिका व इतर कागदपत्राची तपासणी करू शकतील आणि सत्यप्रती सुध्दा प्राप्त करू शकतील. तसेच बॅकेचे संपुर्ण व्यवहार हे भागीदार नं. १ पाहतील त्याचप्रमाणे धनादेशावर भागीदार नं. १ यांची सही करतील व ते धनादेश वटल्या जाईल. किंवा त्यांनी नेमुन दिलेला आम मुखत्यारी हे सर्व व्यवहार पाहातील.

१६) सदर व्यवसायाचे प्रथम वित्तीय वर्ष हे १ एप्रिल ते ३१ मार्च २०२४ हे राहील. सदर एका भागीदाराच्या मृत्युने किंवा निवृत्तीने वरील भागीदारी संस्था विसर्जित होणार नाही व जुने भागीदार मृतक भागीदाराच्या वारसांना भागीदार म्हणून प्रवेश देवु शकतील. भागीदाराच्या मृत्यु, निवृत्तीच्या सहा महिन्यांच्या आत त्याचे हिशोब व देणे–घेणे पूर्ण झालेले असावे. सदर भागीदारी संस्थेच्या नफ्यात निवृत्त भागीदार/मृत भागीदार हे त्यांच्या हिस्याकरीता फक्त निवृत्तीच्या तारखेपर्यत किंवा मृत्युच्या तारखेपर्यत हक्कदार राहतील त्यानंतर त्यांचे वारसदार हक्कदार राहतील. त्याच प्रमाणे कुठलाही भागीदार हा इतर भागीदारांची संमती असल्याशिवाय कुठल्याही व्यक्तीला भागीदार म्हणून समाविष्ट करू शकणार नाही.

१७) सदर भागीदारी व्यवसायाबद्दलचे एकमेकांमधील झगडे, तंटे, भांडण, हे लवाद बोर्ड समोर सोडवतील व प्रत्येक भागीदार हा आपला एक प्रतिनिधी नियुक्त करतील आणी लवाद बोर्ड चा निर्णय हा अंतिम व सर्व भागीदारांना मान्य राहील.

१८) जे मुद्दे भागीदारांच्या अटीमध्ये समाविष्ट नसतील ते भारतीय भागीदारी कायदा १९३२ व सोबत त्या अंतर्गत आजपर्यंतच्या त्यातील सुधारणा, दुरूस्तीच्या तरतुदीप्रमाणे/ अटीप्रमाणे मंजूर केल्या जातील.

१९) भारतीय भागीदारी कायदा १९३२ परिछेद क्रं. ८ प्रमाणे वरीलपैकी एखादा भागीदार दुसऱ्या संस्थेचा भागीदार बनु शकतो.

२०) जर एखादया भागीदारी व्यवसायाची कर्जाऊ किंवा आगावु घेतलेली रक्कम घेणे असल्यास त्यावर १८ टक्के दराने व्याज घेण्यांत येईल किंवा विधी कायदयाप्रमाणे अथवा आयकर कायदया नुसार घेण्यांत येईल. जे वेळोवेळी भागीदार ठरवतील त्याप्रमाणे देय राहील.

खालील साक्षीदारांच्या समक्ष वरील भागीदारांनी हे भागीदारी करारपत्र बनविले आहे व दिनांक ०१/०४/२०२२ रोजी स्वाक्षऱ्या केल्या आहेत.

साक्षदार :

१) Gujarkar

Pratik. D. Gujarkar

२) Dhapodkar

Bhavna. A. Dhapodkar.

भागीदारांच्या स्वाक्षऱ्या



१) श्री. अशोक आनंदरावजी धापोडकर,



२) श्री. भारत अशोकराव धापोडकर,

SEAL OF NOTARY
HAIDARI NAUSHAD S. ALI
NAGPUR DISTT. (M.S.) INDIA
REGD. No. 4594
GOVT. OF INDIA

ATTESTED
1/4/22

NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL